जिल्हा परिषद, वर्धा

## आठवडी बाजार ई - लिलाव सुचना क्र. २ सन २०१६-१७

जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत मांडगांव ता. समुद्रपूर येथील आठवडी बाजार फेर ई लिलाव खालील प्रमाणे करण्यात येत आहे.. ई लिलावाकरीता बयाना रक्कम रुपये ५०००/- व निविदा संचाची किंमत रु. ५००/- आहे. आठवडी बाजार फी वसूलीचा करारनामा ३१ मार्च, २०१७ पर्यत राहील.

लिलाव सरकारी किंमत रु. १३२४४०/- ई- लिलाव दिनांक १३.५.२०१६ वेळ सकाळी ११ ते १.०० पर्यत

| अ.क्र. | ई लिलावाचा तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रकाशित करण्याचा दिनांक | ०२.०५.२०१६ |
| २ | कागदपत्रे व पेमेंट प्रस्तुत करण्याचा सुरुवातीचा दिनांक | ०२.०५.२०१६ |
| ३ | कागदपत्रे व पेमेंट प्रस्तुत करण्याचा शेवटचा दिनांक | ७.०५.२०१६ ला सायं. ५ वाजेपर्यत |
| ४ | कागदपत्रे व पेमेंट अनुमोदीत करण्याचा सुरुवातीचा दिनांक | ७.०५.२०१६ ला सायं. ५ वाजेपासून |
| ५ | कागदपत्रे व पेमेंट अनुमोदीत करण्याचा शेवटचा दिनांक | १२.०५.२०१६ सायं. ५ वाजेपर्यत |
| ६ | लिलावाचा सुरुवातीचा दिनांक | १३.०५.२०१६ ला सकाळी ११.०० वाजेपासून |
| ७ | लिलावाचा शेवटचा दिंनाक | १३.०५.२०१६ ला दु. १.०० वाजेपर्यत |

निविदेतील अटी व शर्ती व निविदा सुचना **http:eauction.gov.in** या वेब साईट वर सविस्तर पाहावयास मिळेल.

### सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाकरिता आठवडी बाजार ई लिलावाच्या अटी व शर्ती.

१ ई लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुक कंत्राटदारांना को-या निविदा संचाची किंमत रु. ५००/- व निविदा बयाना रक्कम ५०००/- मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचे नावे दोन वेगळया डिमांड ड्राप्ट (DD) मध्ये दि. ७.०५.२०१६ ला सायं. ५.०० वाजेपर्यत सादर करावी.

२ सर्व पात्र इच्छुक निविदा धारकांनी ई निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या main portal **http:eauction.gov.in** याचा वापर करावा.

३ इच्छुक कंत्राटदारांनी को-या निविदा ई निविदा अंतर्गत ऑनलाईन विकत घ्यावयाच्या आहे. जे ठेकेदार प्रथमच ई निविदा प्रक्रियेत भाग घेत आहे. त्यांना वरील संकेतस्थळावर दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रथम डिजिटल सिग्नेचर युजर आयडी व पासवर्ड विहित वेळेत प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

४ निविदा धारकांनी निविदा संदर्भात मागणी केलेले दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. आधार कार्ड व पॅन कार्ड सादर करावे.

५ ई - निविदा प्रणाली अंतर्गत विहीत दिंनाकास ज्या निविदाधारकाच्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत व जे निविदाधारक निविदा प्रक्रीयेमध्ये अपात्र ठरतील त्यांना भरलेली अमानत रक्कम संबंधित निविदाधारकांच्या खात्यामध्ये निविदा प्रक्रीया पूर्ण झाल्याच्या दिंनाकापासून संबंधित निविदाधारक मागणी केल्या नंतर परत करण्यात येतील त्यासाठी त्यांनी निविदाधारकांचा बॅक खाते क्रमांक, बॅकेचा पत्ता यांचा उल्लेख करण्यात यावा.

६ सर्वाधिक बोली बोलणा-या निविदाधारकास निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून दोन दिवसाचे आत त्याचे निवेदेची रक्कमेच्या अर्धी रक्कम व उर्वरीत रक्कम लिलाव मंजुर झाल्यावर भरावी लागेल. हया मध्ये अनामत रक्कमेचा समावेश होईल. अर्धी रक्कम दोन दिवसाचे आत भरण्यांस नकार दिल्यास अथवा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेपावेतो न भरल्यांस त्याची अनामत रकम जप्त होईल व लिलाव रद्द केल्या जाईल.

७ लिलावास सक्षम अधिका-याची मजुरी प्राप्त झाल्यानंतर लिलावाची बोलीची राहिलेली उर्वरीत संपुर्ण रक्कम या कार्यालयाचे पत्र प्राप्त झाल्या पासून आठ दिवसाच्या आत तात्काळ या कार्यालयाकडे जमा करावी लागेल. असे न केल्यास ठेकेदाराची पुर्वी भरलेली अर्धी रक्कम जप्त करण्यात येईल. तथा त्या बाजाराचा फेर लिलाव करण्यात येईल यावर संबधिताचा कोणताही उजर वा हक्क राहणार नाही.

८ लिलावाची उर्वरित संपुर्ण रक्कम ठेकेदाराने भरल्यावर रुपये १००/- किवा शासकिय नियमाप्रमाणे आवश्यक रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहिल.

९ लिलावाची बोली सरासरी किंमतीत न आल्यांस फेरलिलांव करण्यांत येईल.

१० कर व फि च्या वसुलीकरीता जिल्हा परिषदेने दिलेल्या पावतीपुस्तकाचा उपयोग दुकानदारांकडुन घेतलेल्या रक्समेच्या पावत्या संबंधितास द्याव्या लागेल.

११. दैवी,नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही कारणांमुळे बाजार काही दिवस बंद राहिल्यास त्यांची नुकसान भरपाई ठेकेदारास मागता येणार नाही.

१२. जिल्हा परिषदेने बाजाराच्या नियंत्रणाखाली केलेल्या नियमांचा ठेकेदारांकडुन भंग झाल्यास ठेकेदारांस प्रकरणाचे स्वरुप पाहुन एकदा वाजवी संधी देवुन लिलांव रदद किंवा फेरलिलांव करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष / मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांचा राहिल.

१३. ग्रापंचायतीचे उत्पन्न वाढिचे दृटिकोणतुन आठवडी बाजार ई- लिलाव प्रक्रियेत, ग्रामपंचायतीस भाग घेता येईल.

१४. बाजार संपल्यानंतर त्या जागेची साफसफाई करण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारांची राहिल व त्या बबतचा कोणताही मोबदला ठेकेदारांस मागता येणार नाही.

१५. वरील बाबतीत किंवा याशिवाय कोणताही फेरबदल करण्याचा अंतिम अधिकार मा.अध्यक्ष /मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, वर्धा यांचा राहिल.

१६. यशस्वी निविदाधारकास, नियम व अटी नुसार करार पूर्ण करु शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने भरलेली अमानत रक्कम जप्त करण्यात येईल व लिलाव रद्द करण्यात येईल.

१७. यशस्वी निविदाधारकाने ५० टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर पूर्ण रक्कम भरेपर्यत लिलावात घेतलेला बाजार संबंधितास सुपूर्द केल्या जाणार नाही.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद,वर्धा,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,वर्धा,